**दिनांक २४/०४/२०२५**

# उमेदवारांसाठी प्राधान्यक्रमाबाबत सर्वसाधारण सूचना
## (TAIT २०२२ - दुसरा टप्पा)

**शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२२ (दुसरा टप्पा) नुसार पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक पदभरतीसाठीच्या रिक्त जागांसाठी प्राधान्यक्रम जनरेट व लॉक करण्याबाबत**

१. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२२ ही दिनांक २२/०२/२०२३ ते दिनांक ३/३/२०२३ या कालावधीमध्ये ऑनलाईन घेण्यात आलेली होती. सदर चाचणीस २,३९,७३० उमेदवारांनी नोंदणी केली होती, त्यापैकी २,१६,४४३ उमेदवार चाचणीस प्रविष्ट झाले होते.

२. TAIT २०२२ मधील प्राप्त गुणांच्या आधारे शासन निर्णय दिनांक ७/०२/२०१९, १०/११/२०२२, १३/१०/२०२३ व इतर आनुषंगिक तरतुदींनुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनांच्या शाळांतील शिक्षण सेवक/शिक्षक या रिक्त पदांवर दुसऱ्या टप्प्यांतर्गत भरती करण्यात येत आहे.

३. शिक्षकांची भरती ही त्या त्या व्यवस्थापनांमध्ये रिक्त असलेली पदे, इयत्तांचा गट (उदाहरणार्थ, इयत्ता १ ते ५, ६ ते ८, ९ ते १०, ११ ते १२ व डी. एड कॉलेज शिक्षक या गटांसाठी) अध्यापनाचे विषय, अध्यापनाचे माध्यम, आरक्षण (समांतर आरक्षणासह) उमेदवारांनी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीमध्ये प्राप्त केलेले गुण व त्यांनी पोर्टलवर लॉक केलेले प्राधान्यक्रम इत्यादी बाबी एकत्रितपणे विचारात घेऊन गुणवत्तेनुसार संगणकीय पवित्र पोर्टलमार्फत ऑनलाईन पद्धतीने निवडीसाठी शिफारस होणार आहे.

४. उमेदवारांसाठी प्राधान्यक्रम जनरेट व लॉक करण्याबाबतच्या यापूर्वी पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध केलेल्या दिनांक ५/०२/२०२४ च्या सूचनांचे अवलोकन करावे. सदरच्या सूचना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

५. TAIT २०२२ चाचणीस प्रविष्ट झालेल्या उमेदवारांना स्व-प्रमाणपत्र तयार करण्यासाठी या पोर्टलद्वारे सुविधा देण्यात आलेली होती.

६. https://tait२०२२.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर दिलेल्या मुदतीत स्व-प्रमाणपत्र (Self Certification) पूर्ण केलेल्या /दुरुस्त केलेल्या व प्रमाणित (Certified) केलेल्या उमेदवारांनाच या प्रक्रियेत सहभागी होता येईल व फक्त त्यांनाच लॉगिन उपलब्ध होईल.

**७. उमेदवारांना प्राधान्यक्रम Generate करण्याची व Lock करण्याची सुविधा दिनांक २५/०४/२०२५ ते दिनाकं २/०५/२०२५ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

८. पोर्टलवर उपलब्ध करून दिलेल्या जाहिरातींचा उमेदवारांनी अभ्यास करावा. सदर जाहिराती उमेदवारांना संकेतस्थळावरील Home page वर Download या मेनूमध्ये पाहता येतील. मुलाखतीशिवाय (Without Interview) व मुलाखतीसह (With Interview) या दोन्ही प्रकारच्या जाहिराती स्वतंत्रपणे उपलब्ध आहेत.

९. प्राधान्यक्रम Generate करून ते Lock करण्यासाठी उमेदवारांना User Manual for Preference Generation TAIT २०२२ या नावाने Home page वर User Manual या मेनूमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

१०. उमेदवारांना लॉगिन केल्यानंतर Generate Preference या मेनूचा वापर करून मुलाखतीशिवाय (Without Interview) व मुलाखतीसह (With Interview) या दोन्ही प्रकारच्या प्राधान्यक्रमांची यादी स्वतंत्रपणे Generate करता येईल. प्राधान्यक्रम Generate केल्यानंतर Generate झालेल्या प्राधान्यक्रमाबाबत आवश्यक ती खात्री उमेदवारांना करता येईल.

११. मुलाखतीशिवाय (Without Interview) व मुलाखतीसह (With Interview) या दोन्ही प्रकारच्या पर्यायासाठी पात्र उमेदवारांना प्राधान्यक्रम Generate होतील. या दोन्ही प्रकारच्या नियुक्तीचे प्राधान्यक्रम उमेदवार Generate व lock करू शकतील. तथापि, मुलाखतीशिवाय (Without Interview) या प्रकारामध्ये शिफारस झालेल्या उमेदवारांचे मुलाखतीसह (With Interview) या प्रकारातील वरच्या गटांसाठी अर्हतेनुसार प्राधान्यक्रम विचारात घेतले जातील.

**१२. उमेदवारांना प्राधान्यक्रम लॉक करण्यासाठी दिनांक २५/०४/२०२५ ते २/०५/२०२५ असा कालावधी देण्यात येत आहे. तथापि, ऐनवेळी उद्भवणाऱ्या समस्या, अडचणी इत्यादी लक्षात घेता उमेदवारांनी त्यांचे प्राधान्यक्रम वेळीच Lock करावेत.**

१३. उमेदवारांना मुलाखतीशिवाय (Without Interview) व मुलाखतीसह (With Interview) या दोन्ही प्रकारात सहभागी व्हावयाचे असल्यास दोन्ही प्रकारचे प्राधान्यक्रम जनरेट करून लॉक करणे बंधनकारक आहे.

१४. जे उमेदवार विहित मुदतीत प्राधान्यक्रम Generate करून lock करणार नाहीत, ते उमेदवार निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतले जाणार नाहीत.

१५. प्राधान्यक्रम Generate करून Lock करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत:च्या शैक्षणिक, व्यावसायिक व इतर अर्हतेनुसार प्राध्यान्यक्रम जनरेट झाले असल्याची खात्री करावी. काही तांत्रिक बाबींमुळे अपवादात्मक प्रकरणी Generate झालेले प्राधान्यक्रम उमेदवारांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेशी सुसंगत नसतील, तेथे अपात्र उमेदवारांची निवडीसाठी / मुलाखतीसाठी शिफारस होणार नाही, त्यामुळे असे प्राधान्यक्रम उमेदवारांनी लॉक करू नयेत. असे केल्यास व परिणामी उमेदवार पात्र नसलेल्या पदावर नियुक्ती / मुलाखतीसाठी शिफारस झाल्यास त्यास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

१६. ज्या उमेदवारांनी दिनांक १२/०२/२०२३ नंतर शैक्षणिक, व्यावसायिक व इतर अर्हता अथवा कोणतीही अर्हता प्राप्त केली असेल अथवा दिनांक १२/०२/२०२३ नंतर अर्हता प्राप्त असतानादेखील दिनांक १२/०२/२०२३ पूर्वी उत्तीर्ण केली असल्याची नोंद केली असेल तरीही अशा दिनांक १२/०२/२०२३ नंतरच्या वाढीव अर्हतेचे प्राधान्यक्रम उमेदवारांना प्राप्त होत असतील, तर असे प्राधान्यक्रम त्यांनी कोणत्याही परिस्थितीत लॉक करू नयेत. या प्राधान्यक्रमाचा कोणत्याही व्यवस्थापनातील (मुलाखतीशिवाय व मुलाखतीसह) नियुक्तीसाठी कोणत्याही स्तरावर विचार होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तथापि, CTET डिसेंबर २०२२ या शिक्षक पात्रता परीक्षेचा निकाल दिनांक १०/०४/२०२३ रोजी घोषित झाला आहे यास्तव केवळ CTET उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्यक्रम उपलब्ध होतील.

१७. उमेदवारांनी स्व-प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे प्राधान्यक्रम Generate होतील. स्व-प्रमाणपत्रामध्ये चुकीची माहिती नोंद झाल्याचे उमेदवाराचे निदर्शनास आल्यास व त्यामुळे प्राधान्यक्रम Generate झाल्यास त्यांनी असे प्राधान्यक्रम लॉक करू नयेत, जेणेकरून त्यांची नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर अडचण/गैरसोय होणार नाही.

१८. उमेदवारांनी प्राधान्यक्रम Generate करून लॉक केल्यानंतर त्यांना प्राधान्यक्रमात बदल करावयाचा असल्यास पूर्वी Generate केलेले प्राधान्यक्रम Delete करून **विहित मुदतीत** प्राधान्यक्रम पुन्हा Generate करून लॉक करता येतील. सदर सुविधेचा वापर विहित मुदतीत उमेदवार जास्तीतजास्त ३ वेळा करू शकतील. सबब उमेदवारांनी आपली अर्हता विचारात घेऊन काळजीपूर्वक प्राधान्यक्रम लॉक करावेत.

१९. उमेदवारांनी ज्या क्रमाने प्राधान्यक्रम लॉक केले आहेत, त्या क्रमाने TAIT २०२२ परीक्षेतील गुणवत्तेनुसार प्राधान्यक्रम विचारात घेतले जातील. उमेदवाराची ज्या प्राधान्यक्रमावर नियुक्तीसाठी / मुलाखतीसाठी शिफारस झाल्यानंतर, उमेदवारांच्या त्या क्रमानंतरच्या उर्वरित प्राधान्यक्रमांचा विचार केला जाणार नाही.

२०. उमेदवाराने किती प्राधान्यक्रम Lock करावेत यासाठी कोणतीही मर्यादा नाही, उमेदवार पात्र असल्यास आलेले सर्व प्राधान्यक्रम Lock करू शकतो.

२१. उमेदवारांचे लॉगिन हे otp base असल्याने त्यांनी नोंद केलेल्या मोबाईल क्रमांकावर otp येणार आहेत. यास्तव ज्या उमेदवारांना लॉगिन करण्यासाठी त्यांचा मोबाईल क्रमांक बदल करून घ्यावयाचा आहे, त्यांनी नजीकच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),शिक्षण निरीक्षक (पश्चिम/दक्षिण/उत्तर) यांचे कार्यालयामध्ये विनंती अर्ज व ओळखपत्राच्या (फोटो आयडी) पुराव्यासह विहित मुदतीत संपर्क साधावा.

२२. उमेदवारांनी पोर्टलवरील स्व-प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती विचारात घेऊन त्यांना प्राधान्यक्रम Generate होतील.

२३. उमेदवारांनी पोर्टलवर अपलोड केलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेची प्रमाणपत्रे, जात प्रवर्ग/ समांतर आरक्षणाची प्रमाणपत्रे, सवलतीसंबंधीची इतर प्रमाणपत्रे जरी अपलोड केली असली, तरी त्यांपैकी कोणत्याही प्रमाणपत्राची पडताळणी किंवा सत्यता पोर्टलमार्फत तपासण्यात आलेली नाही. त्यामुळे उमेदवारांनी केलेल्या कोणत्याही दाव्याच्या पुष्ट्यर्थ संबंधित कागदपत्रे शिफारशीनंतर संबंधित व्यवस्थापनाच्या कागदपत्र पडताळणी समितीकडून पडताळणी केली जाईल. त्यामध्ये कोणतीही तफावत आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर संबंधितांची उमेदवारी रद्द केली जाईल. यास्तव उमेदवारांनी प्राधान्यक्रम लॉक करतेवेळी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

२४. उमेदवाराने पवित्र पोर्टलवर स्वतःचा हेतू साध्य करण्यासाठी खोटी, चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिली असेल, तसेच खरी माहिती लपवून ठेवली असेल, किंवा त्यात बदल केला असेल, किंवा कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये कुठल्याही प्रकारची खाडाखोड दिसून आल्यास किंवा ते प्रमाणपत्र बनावट असल्याचे निदर्शनास आल्यास, असा उमेदवार गैरवर्तणुकीबद्दल कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरून तो योग्य त्या शिक्षेस पात्र राहील.

२५. चारित्र्य-पूर्वचारित्र्य पडताळणीअंती आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी / सेवेसाठी पात्र राहणार नाही. तसेच असे उमेदवार निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरतील.

२६. उमेदवारांनी प्राधान्यक्रम लॉक केल्यानंतर त्याची प्रिंट घेण्यासाठी लॉगिन केल्यानंतर Reports या मेनूमध्ये मुलाखतीशिवाय या प्रकारासाठी View Locked Preferences (Without Interview) तसेच मुलाखतीसह या प्रकारासाठी View Locked Preferences (With Interview) या टॅबवर क्लिक केल्यावर प्रिंट घेता येईल.

२७. उमेदवार एकाच व्यवस्थापनातील एकापेक्षा अधिक गटांसाठी/विषयांसाठी शैक्षणिक, व्यावसायिक व इतर आनुषंगिक अर्हता धारण करीत असल्यास त्यास त्या व्यवस्थापनाचे असे एकापेक्षा अधिक प्राधान्यक्रम उपलब्ध होतील.

२८. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गासाठी पात्र असल्यास ( वय, शैक्षणिक अर्हता तसेच टीईटी/सीटीईटीचे गुण इत्यादी बाबी विचारात घेऊन) त्यांना खुल्या प्रवर्गाच्या पदांचे प्राधान्यक्रम जनरेट होतील.

२९. शासन निर्णय दिनांक ०७/०२/२०१९ अन्वये उमेदवाराची स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेसाठी निवड झाल्यास त्या उमेदवाराचा खाजगी शैक्षणिक संस्थेमध्ये त्याच गटातील नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही. तसेच शासन निर्णय दिनांक १३/१०/२०२३ नुसार "विविध टप्प्यांमध्ये जाहिराती येणार असल्याने उमेदवाराची एकदा निवड झाल्यानंतर अशा

उमेदवाराने पुन्हा नव्याने येणाऱ्या जाहिरातींनुसार अर्ज केल्यास तो निवडीसाठी याच गुणवत्तेनुसार पूर्वी शिफारस झालेल्या गटापेक्षा वरच्या गटासाठी अर्हतेनुसार पात्र राहील.

३०. प्राधान्यक्रम Generate करणे, lock करणे इत्यादीबाबत काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास उमेदवारांना **edupavitra2022@gmail.com** या ई-मेल वर संपर्क साधता येईल.

---//--